


# दैनिक मराठवाडा पत्र


● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ ● https://epaper.marathwadapatra.com






●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १७७ ● शनिवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ● पाने ४ ●किंमत ३ रूपये


## नवरात्र उत्सव

तीसरी माळ



तृतीयेचे दिवशी अंबे
शृंगार मांडीला हो म
ळवट पातळ चोळी कंठी
हार मुक्ताफळा हो
कणकेचे पदके कासे
पितांबर पिवळा हो
अष्टभुजा मिरविसी अंबे
सुंदर दिसे लीला हो
।।३।।



# सिव्हिलचे सुतक फिटले, देवदूत परतला

## आपल्या माती आणि माणसांच्या सेवेत भूमिपुत्र डॉ अशोक थोरात दाखल



**बीड । प्रतिनिधी**

अगदी अकस्मात बीडच्या सिव्हिल सर्जन पदी डॉ. अशोक थोरात यांची नियुक्ती झाली आणि जिल्ह्याला सुखद धक्का बसला. गेली अनेक दिवस इथे सक्रिय आणि स्थिर अधिकारी हवा, अशी लोकमागणी होती. कोरोना मधील काळ डॉ. अशोक थोरात यांच्या रुग्ण सेवेचा जीवनदायी अध्याय होता त्यामुळे इथल्या माती माणसात त्यांची ओळख देवदूत अशीच राहिली आहे. मरण यातना भोगणाऱ्या यंत्रनेला संजीवानी देणारा निर्णय झाल्याचे बोलले जात आहे .

▶▶ उर्वरित पान २ वर

**● या साठी डॉ थोरात लागतात**

सकाळी सकाळी सगळा डॉक्टर ताफा घेऊन साहेब राउंड घेतात .रुग्णांना हक्काचा आवाज हक्काचा माणूस भेटला कि सेवा उभी राहते .अशी माणसे आम्हाला हवी या साठी असतात. डॉ अशोक थोरात, डॉ नागेश चव्हाण, डॉ पारखे साहेब , हे चित्र अनेक वर्षानंतर पुन्हा दिसले .

**● कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया वार्षिक प्रमाण**

| संस्था | डॉ अशोक थोरात कार्यकाळ | डॉ गिते साबळे बडे कार्यकाळ |
|---|---|---|
| केज | ८२६ | ३७९ |
| परळी | ५३७ | ४६६ |
| गेवराई | २२८ | 131 |
| नेकनूर | १२२ | २२० |
| माजलगाव | ४५९ | 321 |
| आष्टी | 110 | 13८ |
| एकूण | २२८२ | १६५५ |

**● ना.तानाजी सावंत यांच्या निर्णयाचे स्वागत**

तानाजी सावंत आरोग्यमंत्री झाले पासून अनेक निर्णय लोकउपयोगी ठरले. बीड मधील लहान मुलीचे अंग भाजले तेव्हा देखील २लाख रुपयांची मदत त्यांनी केलेली आपल्या भागासह अनेकदा आरोग्य शिबीरे घेऊन रुग्ण सेवा त्यांनी केली आहे. अशोक थोरात यांची निवड करून बीड साठी आश्वासक निर्णय घेतल्याचे बीडकर बोलत आहेत हजारो शश्त्रक्रिया करणारे डॉ अशोक थोरात यांना दिल्ली सरकारने सन्मानित केले आहे.महाराष्ट्र सरकार चे अनेक पुरस्कार त्यांना असून त्यांच्या रुग्ण सेवेत त्यांनी केलेली सेवा तत्पर व प्रभावी ठरलेली आहे त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात सिद्ध प्रसिद्ध चेहरा बीड चे सिव्हिल सर्जन झाल्याची चर्चा आहे.

**● डॉ थोरात यांचे सेवाभावी बलाबल; प्रसूतीचे वार्षिक प्रमाण**

| संस्था | डॉ अशोक थोरात कार्यकाळ | डॉ गिते साबळे बडे कार्यकाळ |
|---|---|---|
| केज | २४२४ | ११५२ |
| परळी | २१९६ | १५०० |
| गेवराई | १७१६ | ११५२ |
| नेकनूर | ८४० | ९३६ |
| माजलगाव | १४५२ | ८४० |
| आष्टी | २७६ | ३६० |
| एकूण | ७०९० | ८९०४ |

५९४०



# ते तरुण-तरुणी एकाच धर्माचे...!



**● हॉटेल गोल्डन चॉईस समोर राडा करून पोलिसांच्या कामात अडथळा आणणाऱ्या सात जणांना पोलिसांनी उचलले, हॉटेलवरही कारवाई होणार, कोणत्याही आफवांवर विश्वास ठेऊ नका, पोलिस अधीक्षकांचे आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ०४/१०/२०२४ रोजी बीड शहरातील हॉटेल गोल्डन चॉईस येथे भिन्न धर्मीय तरुण तरुणी एकत्र आले असल्यासंबंधी माहीती बीड शहर पोलीस ठाण्यास मिळताच बीड शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. शितलकुमार बल्लाळ हे स्टाफसह तेथे पोहचले. त्यावेळी हॉटेल गोल्डन चॉईसचे बाहेर मोठ्या प्रमाणात जमाव जमलेला होता. पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांनी सदर तरुण तरुणी यांची पडताळणी केली असता सदरचे तरुण तरुणी हे एकाच धर्माचे व परिचीत असल्याचे आले. सदर तरुण तरुणी यांना अधीक चौकशीकामी पोलीस ठाण्यात घेवुन जात असतांना जमलेल्या आढळुन जमावाने पोलीसांचे वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी बंदोबस्तास असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी जमाव पांगविण्यासाठी सौम्य बळाचा वापर केला.

▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्यास मोठे यश; ऊसतोड कामगारांसाठी 'संत भगवानबाबा ऊसतोड कामगार अपघात विमा' योजना लागू

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याअंतर्गत ऊसतोड कामगार व वाहतूकदार, मुकादम आदींसाठी संत भगवानबाबा ऊसतोड कामगार विमा योजना प्रस्तावित केली होती, त्या योजनेस आज संपन्न झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, मुकादम तसेच सुमारे दीड ते दोन लाख बैलजोड्या त्याचबरोबर कामगारांच्या झोपड्या यांना सुद्धा विम्याचे कवच आज झालेल्या निर्णयानुसार लागू करण्यात येत असून या योजनेचा संपूर्ण खर्च स्व.गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या भांडवलातून खर्च करण्यात येईल. ऊसतोड कामगार, मुकादम, कारखाना यांपैकी कुणावरही या योजनेचा कसलाही आर्थिक भार राहणार नाही.

राज्याच्या बीडसह अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड, जालना, धुळे, जळगाव आदी जिल्ह्यातील सुमारे १० लाख ऊसतोड कामगार वेगवेगळ्या जिल्ह्यात तसेच शेजारील राज्यात कमीत कमी ६ महिने स्थलांतर करून उसतोडणीला जातात. ऊन, वारा, पाऊस, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत दिवसरात्र अत्यंत मेहनत व जोखमीचे काम त्यांना करावे लागते. ऊसतोडणी व वाहतुकीदरम्यान अनेक अपघात, विजेचा शॉक, सर्पदंश, वाऱ्या-पावसाने नुकसान, रस्ते अपघात यांसारख्या शेकडो समस्यांना तोंड देताना ऊसतोड कामगारांचे अनेकदा जीव जातात, अनेकजण कायमस्वरूपी अपंग होतात व त्यांच्या कुटुंबाचा आधार नाहीसा होतो.

त्यामुळे या ऊसतोड कामगारांना, वाहतूक ▶▶ उर्वरित पान २ वर

**● मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय, ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच बैलजोडी व झोपडीला सुद्धा मिळणार विम्याचे कवच**

**● स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या एका स्वप्नपूर्तीत माझा वाटा आहे, याचा आनंद वाटतो : धनंजय मुंडे**

**● मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे मुंडेंनी मानले आभार**

# आ.लक्ष्मण आण्णांच्या प्रयत्नातून विकासासाठी कोट्यावधीचा निधी: शिवराज पवार

## आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नातून ५० कोटी रुपयांच्या रस्ता कांमाचे आज उद्घाटन



**गेवराई । प्रतिनिधी**

मतदारसंघातील रस्ते, जलसिंचन, आगनवाडी, दवाखाना, शाळेच्या इमारती अशा विविध विकास कामे करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा ▶▶ उर्वरित पान २ वर

**मतदारसंघातील दैठण ते कटचिचोली, रा.मा .५० ते टाकळगव्हान, चोपड्याची वाडी, गोपत पिंपळगाव ते काठोडा तांडा, काठोडा तांडा ते जातेगाव, रा.मा ६२ ते चोरपुरी रस्ता कामांच आज रोजी शुभारंभ होणार आहे.**

# बीडमध्ये रिपाइंचे निळे वादळ धडकणार : पप्पु कागदे



**बीड । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भारत सरकारचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने आज शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे दुपारी ३:३० वाजता, केंद्रीय मंत्री रामदास ▶▶ उर्वरित पान २ वर







# माझी 'अभिजात' मराठी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा अधिकृतपणे प्राप्त झाला याचा सर्वच मराठी भाषकांना अभिमान आहे. याचा संदर्भ थेट बीड सोबत असल्याचा विशेष आनंद समस्त बीडवासियांना आहे. याच बीडच्या भूमीत आद्यकवी मुकुंदराज यांनी शके ११९० मध्ये पहिला मराठी ग्रंथ विवेकसिंधू लिहिला.

मराठी भाषा ही मूळची आर्यांची भाषा मानली जाते. भाषेचा उगम उत्तरेकडे झाला असला तरी ही भाषा सातपुडा पर्वतरांगांपासून खाली कावेरी नदीच्या खोऱ्यापर्यंत विस्तारली व स्थिरावली. भाषा दर दहा कोसांवर बदलते आणि त्यानुसार मराठी संभाषणाच्या विविध शैली विकसित होत गेल्या.

मराठी भाषा बोलणारे राज्य म्हणून १९६० साली भाषावार प्रांतरचनेत महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर आजपर्यंत याच सतत विकास आपण बघतो. त्यापूर्वी असणाऱ्या काळातील मराठी भाषेचा प्रवास देखील तितकाच महत्त्वाचा आहे. इसवी सन ५०० ते ७०० या काळात पूर्ववैदिक, वैदिक नंतर संस्कृत, पाली प्राकृत यात विविध उत्क्रांत होत मराठी भाषेचा उगम झालेला मानला जातो. 'श्री चामुन्डाराये करविले' असे शिलालेखावरील मराठी भाषेत लिखित पहिले वाक्य श्रावणबेळगोळ येथे असल्याचा दाखला उपलब्ध आहे.

संत वाङ्मयातून मराठीचा लिखित प्रसार होत गेला. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांच्या रचनांमधून लिखित तसेच बोलीभाषेतील मराठी प्रगत आणि प्रगल्भ होत होती .मराठी भाषेबाबत संत ज्ञानेश्वर यांनी केलेले वर्णन सार्थ आहे. 'परी अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरेचि रसिके मेळविण'.

भाषेत असणारे सौंदर्य आणि ते अधिक खुलविणारे अलंकार सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्याचाही स्विकार करणारी भाषा म्हणून मराठीला पाहिले जाते. सर्व भाषांमधील शब्दांना जोडत आल्याने मराठी अधिकच




समृद्ध झालेली आहे. इतक्या वर्षांच्या प्रवासात विविध शासकांचा अंमल या प्रांतावर राहिला त्यामुळे मराठी भाषेत शब्दसंग्रह सातत्याने वाढत राहिला. अरबी, फारसी, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषेतील शब्द मराठीत कायमचे आले आणि आज ते मराठी भाषेचा भाग बनलेले आपणास दिसतात. आज संगणक युगात मराठी इंटरनेटच्या प्रमुख भाषांपैकी एक आहे आणि मराठी भाषक आवर्जून मराठीचा वापर करतात, ही अतिशय अभिमानाची बाब आहे.

साधारण २०१० च्या प्रारंभी फ सबुकच्या सारख्या माध्यमातून मी म राठी वापरायला सुरुवात केली. त्यावेळी इंग्रजी शब्दावलीत मराठी संदेश लिहिणारे अधिक होते व मराठीचा असा मराठीचा वर्ग मी सुरू केल्यावर अनेक जण मराठी कडे आकर्षित झाले. संगणक क्रांतीत 'युनिकोड' आल्याने या आभासी जगात मराठीचा झपाट्याने विस्तार झाला. मी स्वतः या माध्यमाला दिलेले शब्द आज दरमहा कोट्यावधी वेळा वापरल्याचे संदेश येतात. त्यावेळी मराठी भाषक म्हणून यांचा मलाही अभिमान वाटतो. मराठी भाषेचा प्रवास केवळ पुस्तकातूनच नव्हे तर प्रत्यक्षात अनुभवण्याची संधी मला शासकीय नोकरीच्या निमित्ताने मिळाली. २२ जिल्ह्यांमधून फिरताना त्या त्या ठिकाणचा मराठीचा लहेजा आणि गोडवा जाणवतो. रत्नागिरी ते गडचिरोली असा कार्यक्षेत्राचा प्रवास राहिल्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात जशी भाषा वेगवेगळी बोलली जाते तशीच ती वऱ्हाडात, झाडीपट्टीत, पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात, खानदेशात आणि पुण्या – मुंबईतही वेगळी राहते.

महानगरीय प्रभाव असणारी मुंबईची मराठी खूपच वेगळी आहे. विद्येचं माहेरघर पुण्याची मराठी तितकीच सरळ आहे. आत्मियता जपणारी आणि विशिष्ट शब्दांना खेळवणारी वर्धा – नागपूरची मराठी वेगळी आहे. सिमावर्ती जिल्ह्यांमध्ये सिमेलगत असणाऱ्या नजिकच्या राज्यातील भाषेच्या प्रभावाखाली असणारी मराठी आणखीनच वेगळी वाटते. कोकणात म ालवणी आणि तळकोकणची मराठी आणि गडचिरोलीतील मराठी एकदम भिन्न आहेत. जिल्हा बदल झाल्यास जाणवतं की पदार्थ, वस्तू आणि भांड्यांची नावे एकाच भाषेतली असली तरी ती जुळत नाही. पुण्यात अमृततुल्य अर्थात चहा करतात तर मुंबईत चहा बनवतात. विदर्भात मात्र चहा मांडतात ही भाषिक गंमतच आहे. साधारणपणे रस्त्यावर डावीकडे किंवा उजवीकडे वळतात मात्र खानदेशात डावीकडे फाकाचं असतं.

मराठवाडी माणसं अंगावर कपडे अंगावर घालतात मात्र वैदर्भिय मराठीत कपडे लावतात..खूप वाटत असला तरी तोच मराठीचा वेगळेपणा आहे. अगदी भाषा तीच फरक.. काई त नी. (वर्धा) अर्थात काही तर नाही....!

# बीडमध्ये 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' उपक्रमातून तरूणाईशी थेट संवाद

## अभिनव उपक्रम राबवून करिअर, व्हिजनबद्दल नवमतदारांशी चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी थेट तरूणाईशी संवाद साधला. हा कार्यक्रम शहरातील सौ. के.एस.के. महाविद्यालयात शुक्रवारी (दि.४) पार पडला. यावेळी शेकडो युवा विद्यार्थी –विद्यार्थीनींची उपस्थिती होती.



देशाच्या ताकदीमध्ये युवा शक्तीचा मोठा वाटा आहे. यावेळी तरुणाईचे विचार समजून घेतले. त्यांना करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सारिकाताई क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे प्रमुख उपस्थितीत होते.

तरुण वर्गातील नवम तदारांसमोरील समस्या, त्यांची मते आणि प्रश्न या विषयावर 'युथ टॉक विथ डॉ.योगेश' हा उपक्रम राबविला. डॉक्टर दाम्पत्याने हजारो युवकांशी मुक्तपणे संवाद साधला. यावेळी अनेकांनी आपल्या मनातील प्रश्न विचारले. यामध्ये बीड मतदारसंघातील प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अभ्यास करण्यासाठी वाचनालय उभारण्यात यावे, पालीच्या तळ्यासह अनेक निसर्गरम्य परिसरात सुरक्षा आणि सुविधा मिळाव्यात, ज्याप्रकारे मुलींसाठी हॉस्टेल आहेत, त्याच प्रकारे मुलांसाठी देखील हॉस्टेल असावे. खेळाडूंसाठी विविध ठिकाणी सोयी सुविधा मिळाव्यात. मुलींना पोलीस भरतीचा सराव करताना सुरक्षा पाहिजे. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी येण्यासाठी बसची व्यवस्था करावी, जेणेकरून त्यांना ये जा करण्यासाठी त्रास होणार नाही. यासह अनेक प्रश्न तरूणाईने म ांडले. त्यांच्या प्रश्नांचे निराकरण देखील डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी तितक्याच आपुलकीने, गांभीर्याने केले. यावेळी डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात तरुण वर्गाशी संवाद साधला. त्यामुळे तरुण वर्गात उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले.

### • इतर महाविद्यालयांत कार्यक्रम घेणार

**'युथ टॉक विथ डॉ.योगेश' या अभिनव उपक्रमाअंतर्गत डॉक्टर दाम्पत्याने तरूणाईशी थेट संवाद साधला. त्यांना सौ.के.एस.के. महाविद्यालयात मिळालेला प्रतिसाद पाहून बीडमधील इतर महाविद्यालयांत हा कार्यक्रम घेणार असल्याचा मानस डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.**

# ऐन निवडणुकीच्या तोंडावर सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर; पिंपळवाडीत आरोग्य शिबिरात एक हजारांवर रूग्णांची तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय न होता, आम्ही दररोज चोवीस तास बीडकरांच्या सेवेत आहोत. निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करणारे कार्यक्रम घेण्याऐवजी आरोग्य सेवा देणे माझ्यासह डॉ.योगेश यांना योग्य वाटले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतरांप्रमाणे सक्रीय न होता आम्ही रोज जनतेच्या दरबारात जातो, त्यामुळे बीडची जनता आम्हालाच आशिर्वाद देईल, असा विश्वास कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला.



### डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली रुग्णांची तपासणी

**पिंपळवाडीतील आरोग्य शिबिरास भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रुग्णांसह नागरिकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्वत: काही रूग्णांची तपासणी केली. विधानसभा मतदारसंघातील पिंपळवाडीचे हे आठवे आरोग्य शिबिर असून अनेकांच्या शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात आल्या आहेत.**



बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.४) पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. सारिकाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.

व्यासपीठावर ह.भ.प.भक्तीदास महाराज शिंदे, ह.भ.प. तुकाराम महाराज भारती, माजी आमदार जनार्धन तुपे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, पिंपळवाडीच्या उपसरपंच पूजाताई बहिरवाळ, बेलखंडीचे सरपंच गुंडीबा देवडे, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, करचुंडीचे माजी सरपंच भालचंद्र भंडाणे, भाळवणीचे माजी सरपंच सचिन बहिरवाळ, शिवाजी येडे, मुळूकचे सरपंच रामकिसन कदम, वरवटीचे सरपंच बाळासाहेब इंगोले यांच्यासह पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.सारिकाताई क्षीरसागर म्हणाल्या, रूग्णसेवा हा राजकारणाचा भाग कधीच असू शकत नाही. माझ्यासह डॉ.योगेश हे वैद्यकीय क्षेत्र आणि राजकारणात सक्रीय आहेत. आमची आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सुरु असलेली आरोग्य सेवा राजकारणापलिकडे जाऊन सुरुच राहणार आहे. आम्ही निवडणुकीच्या तोंडावर दिशाभूल करण्याऐवजी शाश्वत विकास कार्यक्रमांवर भर देत राहू. हाच प्रयत्न आगामी काळातही राहील, असे त्या म्हणाल्या. यावेळी श्रीरंग खटाणे, सीताराम बहिरवाळ, रवि काळे, बाळासाहेब थोरात, वैभव तुपे, तुकाराम वाघुले, भास्कर कदम, सुंदर कांगरे, राम जाधव, विनोद बहिरवाळ, भारत डोंगर, बाबुराव वाघुले, अंकुश वाघुले, रामहरी वाळेकर, महेश वनवे, बापू येळवे, बाबा मस्के, बाळासाहेब जटाळ, महेश मातकर, शहादेव खोसे, अशोक वेदपाठक यांच्यासह रूग्ण, ग्रामस्थांची म ोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान १ वरून पुढे.....

## सिव्हिलचे सुतक फिटले...

बीड जिल्हा रुग्णालयात काल फुलांची आरास पाहायला मिळाली डॉ. अशोक थोरात यांचे स्वागत सर्व स्तरातून झाले. सिव्हिल सर्जन म्हणून पुन्हा नियुक्त झालेले डॉ.थोरात हे अपेक्षित होते. गत काळात सरकारी दवाखान्यात अनेक अनुचित प्रकार घडले अधिकारी वेळेवर उपलब्ध राहत नसायचे याम ुळे डॉ थोरात यांची निवड आश्वासक असल्याचे बोलले जात आहे .

## ते तरुण-तरुणी...

पोलीसांच्या कामात अडथळा निर्माण करणे, बेकायदेशीर जमाव जमा करणे या कृत्यासंबंधाने पोलीस स्टेशन बीड शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपी १) शेख वाजेद शेख साजेद, रा. कुरेशी मोहल्ला, मोम ीनपुरा, पेठबीड, २) शेख अखील शेख नवाब रा. चिंचोलीमाळी, दहीफळ ता. बीड, ३) शेख अखील शेख पाशा रा. आरे–पाली नगर, मिराज मजीद, बार्शीनाका, बीड ४) सय्यद जावेद सय्यद बशीर रा. नुरानी मश्जीद, तलगाव नाका, पेठबीड, ५) शेख शोएब शेख जियाउद्दीन रा. इस्लामपुरा, पेठबीड, ६) सय्यद मोहसीन सय्यद मोयनोद्दीन रा. इस्लामपुरा पेठबीड, ७) सय्यद मुजाहेद सय्यद एजाज रा. इस्लामपुरा पेठबीड यांना ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कारवाई सुरु आहे. हॉटेलमध्ये वास्तव्य करतांना हॉटेलमध्ये वास्तव्यासाठी रुम देतांना विहित नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्सवर कारवाई करण्यात येणार आहे.

## धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्यास ...

कामगारांना तसेच त्यांच्या पशूंना स्वतंत्र अपघात विमा योजना असावी, त्याद्वारे मृत्यू झाल्यास आर्थिक मदत, अपंगत्व आल्यास आर्थिक मदत व उपचार अशा निरनिराळ्या तरतुदी असाव्यात असे २०२२ मध्ये धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत प्रस्तावित केले होते.

राज्याचे मुख्यमंत्री व सध्याचे सामाजिक न्याय मंत्री एकनाथराव शिंदे यांनी अर्थ व नियोजन विभागाच्या समन्वयातून या योजनेला मूर्त स्वरूप दिले असून, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. ऊसतोड कामगारांना विम्याचे कवच असावे, हे स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांचे स्वप्न आज महायुती सरकारच्या माध्यमातून पूर्ण होत आहे आणि त्यात माझाही काही वाटा आहे, याचा मनाला मनापासून आनंद वाटतो आहे, याबाबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मनापासून आभार मानतो, असे भावनिक उद्गार धनंजय मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना व्यक्त केले आहेत. पूर्वी केवळ कागदावर राहिलेले ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून सामाजिक न्याय खात्याकडे हस्तांतरित करून घेत धनंजय मुंडे यांनी या महामंडळाला मूर्त स्वरूप दिले. महामंडळाचे कार्यकारी संचालक मंडळ, लेखाशीर्ष निर्माण करून ऊसतोड कामगारांची प्रथमच शासकीय कागदावर 'ऊसतोड कामगार'म्हणून नोंदणी केली. या महामंडळाचा खर्च शासनावर अधिभार होऊ नये म्हणून राज्यात गाळल्या जाणाऱ्या उसावर प्रतिटन १० रुपये कल्याण निधी साखर कारखाना व त्याच्या समप्रमाणात निधी शासनाकडून अशी कायमस्वरूपी व्यवस्था केली. याच महामंडळाच्या माध्यमातून राज्यात संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करून ऊसतोड कामगारांच्या मूला मुलींसाठी ८२ वसतिगृहे सुरू करून ऊसतोड कामगारांच्या हातात वडिलोपार्जित कोयता न देता पाटी–पुस्तक देऊन शिक्षणाचा मार्ग खुला केला आहे. त्यापाठोपाठ आता ऊसतोड काम गारांच्या विम्याचा प्रश्न निकाली निघाल्याने काही प्रमाणात का असेना परंतु कायम विकासापासून वंचित राहिलेल्या या वर्गाला खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे, असे म्हणता येईल.

## आ.लक्ष्मण आण्णांच्या...

पवार यानी सरकार दरबारी पाठपुरावा करून मतदारसंघातील सर्वांगिण विकासासाठी कोट्यावधीचा निधी आणून मतदारसंघाचे चित्र बदलत आसल्याचे शिवराज बाळराजे पवार यानी गावातील विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना म्हटले. दि. ४ ऑक्टोबर रोजी म न्यारवाडी,धोडराई, बेलगाव,भोजगाव, आदि गावच्या रस्ता कामांचा शुभारंभ युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते करण्यात आला. यावेळी सरपंच बाबासाहेब पवार, उपसरपंच हरीभाऊ निकम,सुदाम बप्पु डिंगरे, नारायण जगताप, संतोष सोनमाळी, केशव साळुंके, परमेश्वर पवार, संजय जाधव पंचायत समिती सदस्य, नंदू शेठ गरड सरपंच, अशोक खिसाडे,दत्ता गवळी,बाबासाहेब डिंगरे, आसाराम डिंगरे, लक्ष्मण घाडगे,राम नाना डिंगरे, गिरजा आप्पा मराठे, ॲड.राजेंद्र साळुंके, रमेश पोटे,मदन डिंगरे, हरीभाऊ डिंगरे,पिंटू फरताडे, राजेंद्र फरताडे, कैलास कदम, भिमराव पवार, रघुनाथ सोनमाळी, भगवान सोनमाळी, शिवाजी जगताप राहुल बर्गे रखमाजी डिंगरे, विष्णू टिंगरे, बाबू टकले, वैजनाथ सोनमळी, सयाजी जगताप, जालिंदर यादव, लहू घाडगे, शिवाजी घाडगे, गणेश महाराज नावडे, लक्ष्मण घाडगे, जनार्दन शिंदे भीमराव घाडगे भानुदास चव्हाण बंडू घाडगे सुदाम घाडगे मदन घाडगे परभू मामा टकले रघुनाथ डिंगरे मदन नाना डिंगरे आसाराम पवार ज्ञानेश्वर खरवडे बाबुराव घाडगे भीमराव फरताडे भाऊसाहेब गायकवाड अविनाश पोटे, गणेश आखरे, नितेश निकम मदन निकम महेश घाडगे अभिम ान घाडगे प्रकाश घाडगे महादेव पोटे बाबासाहेब जगताप विकास टकले रवींद्र जगताप परमेश्वर घाडगे विष्णू घाडगे गावातील नागरिक उपस्थित होते.

## बीडमध्ये रिपाइंचे निळे....

आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सपन्न होतो आहे. या ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्यात निळे वादळ उसळणार आहे. मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्री म्हणून निवड झाली आहे.या निवडीचा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्याकडून ऐतिहासिक सत्कार सोहळा आयोजित केला आहे. या सत्कार सोहळ्याची अतिशय जय्यत तयारी बीड शहरात करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने होल्डिंग, कमानी, बॅनर, निळ्या पट्ट्या व निळ्या ध्वजाचा झंझावात निर्माण करुन निळ्या वादळाचे शक्तिप्रदर्शन रिपाइंच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान मंत्री रामदास आठवले यांचा हा सत्कार सोहळा ऐतिहासिक ठरणार असून त्यासाठी जिल्हाभरातून रिपाइं कार्यकर्ते हजारो गाड्यांचा ताफा घेऊन दाखल होणार आहेत. बीड शहरात रिपाइंच्या वतीने होणाऱ्या मंत्री रामदास आठवले यांच्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात हजारोच्या संख्येने सामील होऊन, निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन करावे.असे आवाहन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

पान ४ वरून पुढे.....

## आज अनिलदादा जगताप...

उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला–भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी.

## हिरव्या झेंड्याचे निमित्त...

कॅमेरा द्वारे थेट चित्रीकरण करून निकाल दिले गेले. निकाल कॅमेऱ्याच्या चित्रीकरणावेळी कॅमेराला पूर्ण अडथळा होणारा ध्वज बाजूला काढावा लागला. योगायोगाने तो ध्वज हिरवा होता. व्हिडिओ क्लिपची छेडछाड करून वाद निर्माण होईल, एवढीच क्लिप व्हायरल करण्यात आली. प्रत्यक्षात कोणताही जातीय व धर्मीय अभिनिवेश न बाळगता झेंडे लावले होते. मनात किंतु परंतु असता तर सुरुवातीलाच हिरवा झेंडा लावला नसता. परंतु अर्धवट माहितीच्या आधारे खेळ संस्कृतीत जातीय द्वेष निर्माण केला. अशाप्रकारे खेळ संस्कृती राजकीय खेळी करून सामाजिक सौदार्ह दूषित करू नये, असे विनम्र आवाहन मित्र मंडळाचे शफिक काझी, सलीमभाई काझी यांनी केले आहे.

अलीकडे विधानसभा निवडणुकीचा हंगाम डोळ्यासमोर भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंना जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय हि खेदाची बाब आहे. आजच्या सामाजिक वातावरणात ही बाब निश्चितच चिंतनीय वाटली . कोणताही जातीय भेदा भेद न मानता सर्व जाती धम ्च्या व्यक्ती बरोबर सलोखा आणि दिलदार वृत्तीने स्नेह आणि संपर्क ठेवणार्या व्यक्ती विषयी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या व्यक्तीकडून राजकीय हेतूने कलुषित भावना समाजा समोर व्यक्त करणे गैर आहे. एखाद्या जातीवादी व्यक्तीकडून हे घडले असते तर दुःख वाटलं नसतं. राजेंद्र म स्के यांचं सहिष्णू व संयमी व्यक्तीमत्व सर्व धर्मीय लोक जाणून आहेत. कृपया असा रिकामा खटाटोप करू नये. असे शेख शरीफ, शफिक काझी, सलीमभाई काझी, सलिम कुरेशी यांनी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## डिजिटल मीडिया परिषदेचे..

करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तथा पत्रकार संरक्षण कायद्याचे जनक एस एम देशमुख हे आवर्जून उपस्थित राहणार असून तालुक्यातील सर्व प्रेस व डिजिटल मीडियाच्या पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. याप्रसंगी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, गेवराई तालुकाध्यक्ष मधुकर तौर यांच्यासह म राठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास गेवराई, परळी , आंबाजोगाई, केज, बीड, आष्टी, पाटोदा, शिरूर, वडवणी, धारूर, माजलगाव या तालुक्यातील सर्व मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पत्रकार बांधवांनी आवर्जून बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, डिजिटल मीडिया परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांच्यासह डिजिटल मीडियाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात



*बीड शहरातील अंबिका चौक येथे जय मातादी नवरात्र उत्सव समितीच्या आई तुळजाभवानीची पहिल्या माळीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले,तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे, युवा नेते अजय गायकवाड सह मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते..!! 'आज माझ्या बाभळवाडी गावातील तुळजाभवानी आईची पहिल्या माळीची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक व युवा तरुण सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..*

## माजलगावमध्ये बदलापूरसारखी घटना; नामांकित शाळेच्या अंगणवाडीत चिमुकलीवर अत्याचार

**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका खासगी शाळेतील अंगणवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एका अज्ञाताविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. राज्यात बदलापूरच्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली असून त्यानंतर दररोज कोठे ना कोठे शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या, अन्यायाच्या घटना घडत असल्याच्या उघड होत आहेत. त्यामुळे पालक वर्गात अगोदरच भीतीचे वातावरण पसरलेले आहे. बीड जिल्ह्यातील माजलगाव शहरालगत असलेल्या एका शाळेत अंगणवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले-मुली दररोज येतात. या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते. तिच्यावर शाळेतील एका अज्ञात इसमाने २७ सप्टेंबर रोजी मधल्या सुटीतील डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली. त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले. घरी आल्यावर चिमुकलीने शाळेत पांढरे कपडे घातलेल्या व्यक्तीने घाणेरडे कृत्य केल्याचे पालकांना सांगितली. शाळेतील पांढरे कपडे घातलेला त्या माणसाला मी ओळखते असेही सांगितले. चिमूरडीच्या माहितीने हादरलेल्या पालकांनी गुरुवारी थेट माजलगाव शहर पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात व्यक्तीविरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को गून्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणा उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ व त्यांचे सहकारी करत आहेत. या घटनेने मात्र शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदीं आज महाराष्ट्र दौऱ्यावर

## महाराष्ट्र दौऱ्यात सुमारे ५६, 100 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ

**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून, वाशिम आणि ठाणे येथे विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. पंतप्रधान सकाळी ११.१५ वाजता वाशिममधील जगदंबा माता मंदिरात दर्शन घेतील आणि संत सेवालाल महाराज आणि संत रामराव महाराज यांच्या समाधीवर श्रद्धांजली वाहतील.



वाशिममध्ये पंतप्रधान २३,३०० कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुपालन क्षेत्रातील विविध उपक्रमांचा शुभारंभ करतील. या योजनेत प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १८वा हप्ता वितरित केला जाणार असून, यामुळे सुमारे ९.४ कोटी शेतकऱ्यांना २०,००० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. पंतप्रधान कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत सुमारे १,९२० कोटी रुपयांचे ७,५०० हून अधिक प्रकल्प समर्पित करतील. तसेच, ९,२०० शेतकरी उत्पादक संघटनांचे राष्ट्रार्पण करतील.

तसेच, बंजारा समाजाच्या समृद्ध वारशाचे प्रतीक असलेल्या बंजारा विरासत संग्रहालयाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

दुपारी ४ वाजता, पंतप्रधान ठाणे येथे सुमारे ३२,८०० कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये मुंबई मेट्रो लाईन ३ फेज १ च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या टप्प्याचे उद्घाटन होणार आहे. हा प्रकल्प मुंबईतील शहरी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. याशिवाय, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि उन्नत पूर्व मुक्त मार्ग विस्तार प्रकल्पांचीही पायाभरणी होईल. ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचा पायाभरणी समारंभही पंतप्रधानांच्या हस्ते पार पडणार आहे.

ठाण्यातील आणखी एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र प्रकल्प, ज्याची फेज-१ पायाभरणी होणार आहे. या प्रकल्पामुळे या भागातील पायाभूत सुविधा विकासाला गती मिळणार आहे. या दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या कृषी, नागरी आणि औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत, ज्यामुळे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल.

## अभिजात भाषेचा दर्जा हा ज्ञानेश्वर माऊली, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भाषेचा सन्मान: राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठीसह पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत. समस्त महाराष्ट्राच्या आणि मराठी भाषेच्या इतिहासात आजचा हा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असे त्यांनी सांगितले.

संत ज्ञानेश्वर माऊली, संत चक्रधर स्वामी, जगद्गुरू संत तुकाराम यांसह महाराष्ट्रातील अनेक संतांची व समाजसुधारकांची भाषा असलेल्या मराठीला अभिजात भाषा जाहीर झाल्यामुळे सन्मानप्राप्त झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, लोकमान्य टिळक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसह असंख्य स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिकारक तसेच जनसाम ान्यांच्या लाडक्या मराठी भाषेचा सन्मान प्रत्येकाला सुखावणारा आहे.

माय मराठीला बहुप्रतिक्षित अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल मी माननीय प्रधानमंत्री यांचा आभारी आहे. पाली, प्राकृत, बंगाली आणि आसामी या



भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा मला आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठीला अभिजात भाषा म्हणून मान्यता देण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर, अधिकाधिक लोक, विशेषत: युवक आणि लहान मुले मराठी भाषा शिकतील, बोलतील व या भाषेत लिहितील तसेच मराठी भाषा विश्र्वभाषा करण्यासाठी प्रयत्न करतील, असा विश्वास यांनी व्यक्त केला. या आनंदाच्या प्रसंगी राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी राज्यातील जनतेचे आणि जगभरातील मराठी भाषिकांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेच्यावतीने केंद्रीय मंत्रिमंडळाचे आणि विशेषतः प्रधानमंत्री श्री.म ोदी यांचे या निर्णयाबद्दल राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी आभार मानल्याचे संदेशात म्हटले आहे.

## स्वागताचे बॅनर काढताना युवकाने प्राण गमावले

**माजलगाव । प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा माजलगावात मंगळवारी आयोजित करण्यात आली होती. या निमित्त अजित पवारांच्या स्वागताचे बॅनर शहरातील मुख्य रस्त्यावर व राष्ट्रीय महामार्गावर लावण्यात आले होते. यातीलच धरणाच्या कमानीजवळ लावलेले एक बॅनर काढताना वीज वाहक तारेला बॅनरचा स्पर्श होऊन गौतम सरपते ( रा.केसापुरी ) या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार रोजी रात्री ११ वाजता घडली.

५ किमीपर्यंत लावण्यात आलेल्या बॅनरमुळे शहरातून चालणे मुश्किल झाले होते. दरम्यान, बाजारसमितीचे सभापती यांनी धरणाच्या कमानीजवळ त्यांचे स्वतःचे बॅनर लावले होते.

बुधवारी रात्री अकरा वाजता हे बॅनर काढत असताना बॅनरचा स्पर्श वीज वाहक तारेस झाल्याने विजेचा धक्का बसून गौतम हरपते ( २५ ) या युवक कोसळला. त्याला खाजगी रुग्णालयास उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

# विजयादशमीचा मानकरी जेजुरीचा ऐतिहासिक महाखंडा अद्यापही उपेक्षित, ट्रस्टीचा मनमानी कारभार

**जेजुरी । प्रतिनिधी**

विजयदशमी हा भारतभर साजरा होणारा लोकप्रिय सण असुन या सणात शस्त्र पूजनाला फार महत्व मानले जाते जेजुरीच्या खंडोबा गडावरील जगप्रसिद्ध असलेला महाखंडा ही तीनशे वर्षांपूर्वीची इतिहास कालीन तलवार ही बेचाळीस किलो वजनाची असुन यास धार्मिक ऐतिहासिक महत्व प्राप्त असुन देखील केवेळ देवसंस्थान विश्वस्थानच्या मनमानी आणि अहंकारी भूमिके मुळे सदर तलवार चक्क पत्र्याच्या पेटीत ठेऊन इतिहासाच्या शस्त्र शास्त्र नितीचा अवमान केला असल्याची खंत माझी देवसंस्थान चिप ट्रस्टी संदिपआप्पा जगताप, मल्हाराजे प्रतिष्ठान, समस्त ग्रामस्थ खान्देकरी मानकरी गावकरी , रंभाई शिंपीन ट्रस्ट धालेवाडी आणि खंडा बहाद्दरांनी व्यक्त केली आहे मंदिराच्या लोक परंपरा संस्कृती या बद्दल सध्याच्या विश्वस्त कमिटीचे अज्ञान आणि राजकीय हितसंबधातून जेजुरी गडावर निवडून आलेले विश्वस्त मनमानी कारभारतुन गडावर मागील ट्रस्टींनीं या महा खंडाचे धार्मिक ऐतिहासिक सांस्कृतिक महत्व पाहता उपलब्ध करून ठेवलेल्या मेघडंबरीत ही तलावर न ठेवता पत्र्याच्या पेटीतून ठेवून एक प्रकारे भारतीय शस्त्राचा आवमान करीत असल्याचे उघड झाले आहे.वास्तविक पाहता जेजुरीचे हे ऐतिहासिक शस्त्र पाहण्या करिता मॉरीशेष, रशिया, फ्रांस जर्मनी, जपान आणि इंग्लंड व इतर प्रदेशातून खास ही तलवार पाहण्याकरिता विदेशी पर्यटक येत असतात परंतु भाषा न समजल्याने अथवा ट्रस्टिकडून याबत चे फलक नसल्याने त्यांना इतिहास ज्ञात होत नाहीं याकरिता हिंदी इंग्रजी आणि मराठी आणि इतर प्रादेशिक भाषेत या शस्त्राची माहिती फलक लावणे आवश्यक असल्याचे नागरिक पर्यटक भविकानेचे म्हणणे आहे. विशेषतः विजयादशमीला भारतीय शस्त्र आणि खंडोबा देवाचा नवसाला आलेला खंडा महत्वाचं असल्यामुळे या खंडा शस्त्राची विशेष पूजा करून चित्तथरारक कसरत करण्याची पारंपरिक प्रथा आजही साडर केली जाते यात कसरती आणि तोलून धरण्याच्या स्पर्धा मधून पारितोशिक ही दिले जाते या बाबत जर्मनी हेंडलबर्ग युनिव्हरसिटी चे इतिहास अभ्यासक कै. डॉ गुंठुर सोन्थ्यमार यांनी या तलवारीवर चाळीस वर्षापूर्वी लघपट देखील प्रसारित केला होता. या सर्व बाबी पाहता अनेक वेळा ट्रस्ट कमिटी जी सेल्फी आणि स्व जाहिरातीत मग्न असते ती म ागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते असे चित्र स्पस्ट झाले आहे सध्या विश्वस्त व्हिआयपी आणि राजकीय व्यक्तींच्या खंडोबा दर्शन व्यवस्थेत मशगुल असुन मंदिराचा सांस्कृतिक विकास त्याचे सामाजिक धार्मिक महत्व भाविक पर्यटक सोय सुविधा मंदिराच्या ग्राम विकासाकडे परंपराकडे दुर्लक्ष करून व्हीआय पी आणि अधिकाऱ्यांच्या मर्जी सांभाळन्यात धन्यता मानत आहेत. सदर खंडा १७६३ते १७६६च्या दरम्यान पुरंदरच्या ऐतिहासिक पानसे सरदार घराण्याने नवस पूर्ती म्हणून अर्पित केल्याचा इतिहास



सांगितलं जातो अशा धार्मिक आध्य्यत्मिक सांस्कृतिक दृष्ट्या इतिहासिक शस्त्राला पत्र्याचे पेटीत ठेऊन ट्रस्ट नेमके काय साधते हे समजू शकत नाहीं सद्या तरी नथ सोन्याची आणि चेहरा पत्र्याचा अशी गत देवसंस्थांची झाली आहे या बाबात स्थानिक नागरिकांना सह शासन धर्मदाय आयुक्तानी लक्ष न दिल्यास महत्वपूर्ण ऐतिहासिक अनमोल असा ठेवा पत्र्यातून ही नस्ट होण्याची भीती व्यक्त होत आहे.


**Detailed Tender Invitation.**

**Name of the work:**

CONSTRUCTION OF **MAIN TEMPLE BUILDING** AT SAVARGAON-**Phase 3 (2024)**; FOR **SHRI KSHETRA MACCHINDRANATH DEVASTHAN**. Taluka: ASHTI Dist: BEED

**Notice:**

1. Sealed Percentage rate Tender in B-1 form are invited from reputed, experienced, and qualified civil contractors (experience in large building works preferred). The contractors with high inclination towards quality deliverables within stipulated time and cost are highly anticipated.
   The details are as under.

| Sr. No. | Name of the work | Estimated cost. In Rs. | Earnest money In Rs. | Security deposit In Rs. | Time limit in calendar months |
|---|---|---|---|---|---|
| 1. | CONSTRUCTION OF MAIN TEMPLE BUILDING-PHASE 3AT SAVARGAON. Taluka: ASHTI Dist: BEED | 1,10,17,690.00 | 1,10,177.00 | 5,50,885.00 | 12 MONTHS |

2. Tender form, conditions of contract, specifications and the contract drawings can be had on cash payment of **Rs. 1,000 (Rupees One thousand only)** per set from the office of **SHRI KSHETRA MACCHINDRANATH DEVASTHAN** on **5-10-2024** during working hours (11.0 am to 7.00 p.m.) Further information regarding the work can be obtained from the above office. The tender will be received in the office of the **SHRI KSHETRA MACCHINDRANATH DEVASTHAN** on **11-10-2024** up to **5.00 pm** and will be opened on the **11-10-2024 at 6.00 pm**, in the presence of such intending tenders or his/ their representatives who may present at that time. Tenders sent by post shall be sent in good time by registered post and must reach by above time & date. For late delivery or no delivery by postal authority the employer shall not be responsible.
3. The offer shall be valid for 90 days from the date of opening of the tender.
4. Right is reserved to reject any item of tender, or a tender or all tenders without assigning any reasons therefore, the decision for acceptance of tenders will rest with the Trustee, **SHRI KSHETRA MACCHINDRANATH DEVASTHAN.**
5. No alternative designs will be accepted for this work.
6. No suggestions / conditions will be accepted for this work.

CHAIRMAN
SHRI KSHETRA MACCHINDRANATH DEVASTHAN, SAVARGAON

ARCHITECT
RAVBIM OPC PVT LTD, PUNE


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२५९/२०२४**

**केशरबाई प्र. भारत ठोकरे विरुध्द निरंक**

**ॲड. शेळके वाय. आर.**

अर्जदार :- १) केशरबाई भ्र.भारत ठोकरे, वयः ६६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. पिंपळनेर ता. जि. बीआर २) वसंत पि.भारत ठोकरे, वय : ३१ वर्षे, धंदा :शेती, रा. सदर. ३) रेणुका भ्र. अशोक क्षीरसागर, वय : ३५वर्षे, धंदा :घरकाम, रा. चऱ्हाटा ता.जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **भारत पि. बद्रीनाथ ठोकरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **भारत पि. बद्रीनाथ ठोकरे** रा. पिंपळनेर, ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ३०/०१/२०२२४ रोजी पिंपळनेर, ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क. १ हया मयताच्या पत्नी आहे. अर्जदार क. ०२ मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ०३ हि मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय काम ाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **भारत पि. बद्रीनाथ ठोकरे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०९/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १०/१०/२०२४.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीरनामा

**मा. श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी अर्ज नंबर १३८९/२०२४**

**राजुबाई वि. कोणीही नाही**

**विधीज्ञ - एस. एस. महाजन**

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १) राजुबाई आसाराम काळे, पत्ता - लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड. २) सुनिल आसाराम काळे, लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड, ३) अनिल असाराम काळे, लक्ष्मी नगर, जालना रोड, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **आसाराम विश्वनाथ काळे हे** राहणार बीड ता. जि. बीड हे दिनांक ३०/०९/२०१६ रोजी कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर येथे मयत झालेल्या / झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयत नामे आसाराम विश्वनाथ काळे, यांची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत.

मयत नामे **आसाराम विश्वनाथ काळे** यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, **आसाराम विश्वनाथ काळे,** यांचे त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख ०६/११/२०२४ आहे.

आज दिनांक ०३/१०/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## महत्वाचे...



*बीड : जिल्ह्याच्या माजी खासदार, लोकनेत्या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या स्मृतीदिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील समाधीस्थळावर जाऊन अभिवादन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह गवगण शिक्षण संस्थेसह पक्षाचे. पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



*सर्वसामान्यांचा नारायण गड येथील दसरा मेळावा...हे चेहरे नीट बघा. किती सेवाभाव दिसतो चेहऱ्यावर. नारायण गड येथे होत असलेल्या पारंपारिक दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी असे हजारो हात राबत आहेत. बाहेरून येणाऱ्या भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, त्यांच्या पायात काटा देखील टोचणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जात आहे. अवघे ऊन डोक्यावर घेऊन हजारो हात झटत आहेत. झटणाऱ्या हाताला आलेल्या फोडाचा शेवट तेव्हाच गोड होईल, जेव्हा इथे लाखो भाविक एकमेकांची गळाभेट घेतील. दसरा मेळावा...*

### नागनाथ विद्यालयाचा रोहित जाधव जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम

**बीड । प्रतिनिधी**



युवक सेवा संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रिडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेत नागनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सैनिकी विद्यालय बीड येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धेत नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या रोहित भारत जाधव याने ६० किलो वजन गटातून जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम आला असून त्याची विभागीय क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे तसेच साहिल हौसेराव जाधव मैदानी थाळीफेक क्रिडा स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातून तालुक्यातून प्रथम तर १९ वर्षे वयोगटातून २०० मिटर धावणेमध्ये सुमित संजय जाधव तालुक्यातून तृतीय आला. या सर्व यशस्वी खेळाडूंचे आशर्द शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.बी. माटे, पर्यवेक्षक बी.एस. वाणी, क्रिडा शिक्षक अमरसिंह काकडे, सर्व शिक्षक, शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील क्रिडा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आज अनिलदादा जगताप यांच्या संकल्पनेतली होम मिनिस्टर स्पर्धा

## फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह विजेत्या महिलांना मिळणार पैठणी साडी ; सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु!



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने आज दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ६.०० वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी १ एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी १ शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील २१ विजेत्या महिलांना प्रत्येक १ पैठणी अशा २१ पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● बीडमधील महिला-भगिनीं जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे: अनिलदादा जगताप

**बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. ५ ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं ६.०० वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

## हिरव्या झेंड्याचे निमित्त करून शर्यतीत राजकारण करण्याची गरज नाही: शफिक काझी, सलीमभाई काझी

### विनाकारण राजेंद्र मस्केंना बदनाम करण्याचा प्रयत्न: शेख शरीफ

**बीड । प्रतिनिधी**



अलीकडे विधानसभा निवडणूकीचा हंगाम डोळ्यासमोर ठेवून राजेंद्र मस्के यांना जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दोन दिवसांपूर्वी राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड येथे भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध राज्यातून शेकडो बैलगाडा स्पर्धक बीड मध्ये शर्यतीत सहभागी झाले होते. अत्यंत उत्कृष्ट नियोजनातुन यशस्वीपणे शर्यत पार पडली. नियोजन समितीमध्ये झेंडा पंच म्हणून मुस्लिम कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली होती. नियोजन, शर्यत स्पर्धक, आणि प्रेक्षकात सर्व जाती धर्मातील लोक सहभागी झाले होते.

खेळ संस्कृतीला अनुसरून या शर्यती दरम्यान मैदाना भोवती भगवा, हिरवा, निळा, पांढरा, केसरी असे विविध रंगाचे झेंडे लावले होते. पारदर्शक निकाल देण्यासाठी थर्ड अंपायर करिता विशेष ▶▶ उर्वरित पान २ वर

## डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांचा उद्या गेवराईत सत्कार : एस एम देशमुख राहणार उपस्थित

**गेवराई । प्रतिनिधी**



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी अनिल वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल उद्या दिनांक ६ ऑक्टोबर रोजी गेवराईत त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यास अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख उपस्थित राहून मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमास पत्रकारांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, गेवराई तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांनी केले आहे.

डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या प्रदेशाध्यक्षपदी बीड जिल्ह्याचे सुपुत्र अनिल वाघमारे यांची तर प्रदेश कार्याध्यक्षपदी संतोष शिंदे आणि कार्यकारणी सदस्य पदी जितेंद्र सिरसाट यांची नुकतीच निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचा उद्या दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह गेवराई येथे गेवराई तालुका डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवाजीराव दादांनी सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपला : अक्रुर महाराज साखरे

**गेवराई । प्रतिनिधी**




राजकारण करत असताना संत विचाराची कास धरुन शिवाजीराव पंडित यांनी सर्व जातीधर्माच्या माणसांना एकत्र आणून समाजविधायक कामे केली आणि सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जोपासला असे प्रतिपादन ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांनी केले. शिवाजीराव पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने आयोजित किर्तन महोत्सवात ते बोलत होते.

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा आणि कीर्तन सोहळ्यात किर्तनसेवेचे पहिले पुष्प प्रतिपादन ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे यांनी गुंफले. यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या ' माझे जातीचे मज भेटो ' या अभंगावर आपल्या मधुर वाणीतून निरुपण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगातून एक इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या विचारांचे माणसं मला हवी आहेत, भिन्न विचाराची माणसं नको. निरुपण करताना साखरे महाराज पुढे म्हणाले की, आपल्या इच्छा कधीच पुर्ण होत नाहीत, कारण आपण संसारात अडकलेले असतो. शिवाजी महाराजांनीही एक विचारांची आणि सर्व जाती धर्माचे मावळे गोळा करून स्वराज्य निर्माण केले. हा संताचा विचार आहे, तो आपण अंगिकारला पाहिजे. यावेळी साखरे महाराजांनी विविध प्रमाण देऊन आपल्या किर्तनसेवेत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आपल्या गोड गळ्यातून अभंग रचना गाऊन उपस्थितांन खिळवून ठेवले.

याप्रसंगी गायक तुळशिराम अतकरे, सुग्रीव तावरे(पखवाज) उत्तम नाना मोटे (हार्मोनियम) राजेंद्र काळे ( हार्मोनियम) यांनी साथ दिली. ह.भ.प. कृष्णा महाराज ह.भ.प. रघुनाथ निंबाळकर, ज्ञानेश्वर औटी, बळीराम यादव, सुत्रसंचालक मानव चाटे, माऊलीदादा वारकरी संगीत विद्यालयाचे संचालक गणेश महाराज लोंढे आणि त्यांचे विद्यार्थी यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य आणि महिला पुरुष भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ● राहुल खरे यांची अभंगवाणी रंगली

**सायंकाळच्या सत्रात इंडियन आयडॉलफेम गौरव महाराष्ट्राचा विजेता राहुल खरे यांची अभंगवाणी कार्यक्रम चांगलाच रंगला. यावेळी त्यांनी विविध अभंग, गवळणी आणि भाव गिते सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी त्यांना तबल्यावर पवन उदे, हार्मोनियम वर राजेंद्र काळे आणि पखवाज वर अविनाश येवले यांनी संगीत साथ दिली. माधव चाटे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. यावेळी भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## दस्तऐवज नोंदणीसाठी 500 रुपयांचे मुद्रांक शुल्क सक्तीचे करत गोरगरीबांच्या घरावर दरोडा घालणे बंद करावे: डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



राज्य सरकारने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करून मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्याने महसूल विभागाकडून आता दस्त नोंदणीसाठी १०० आणि २०० रूपयांचे मुद्रांक शुल्क बाद करून केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारण्याचा सक्तीचा शासन निर्णय खरेदी , नोटरी, हक्क किंवा प्रतिज्ञापत्रासाठी गोरगरीबांना आर्थिक संकटात टाकणारा असुन लाडक्या बहिणीला १५०० रूपये महिना सारखी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेल्या सवंग योजनेमुळे शासनाची तिजोरी रिकामी झाली असुन ती भरण्यासाठी मुद्रांक शुल्क वाढीचा गोरगरीबांच्या घरांवर दरोडा घालणारा निर्णय रद्दबातल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०४ शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी धरणे आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, पालकमंत्री धनंजय मुंडे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,रामधन जमाले, अशोक येडे,शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन बप्पासाहेब पवार, आदी सहभागी होते.

राज्याचे मुद्रांक धोरण बदलुन आता कोणत्याही नोंदणीसाठी ५०० रूपयांचा मुद्रांक सक्तीचा करण्यात आला आहे.आतापर्यंत सरकारी दस्तावेज असो किंवा साधी नोटरी करायची असो तसेच बँकेतुन कर्ज घ्यायचे असो सर्वसाधारणपणे नागरीकांना किमान १०० रुपयांच्या मुद्रांकावर नागरीकाचा दस्तावेज ग्राह्य धरला जात होता.मात्र यापुढे १०० आणि २०० रुपयांचे मुद्रांक पेपर ईतिहास जमा होणार आहेत कारण आता किमान ५०० रुपयांचा मुद्रांक खरेदी, नोटरी, हक्क किंवा प्रतिज्ञापत्रासाठी सक्तीचा करण्यात आला आहे. राज्य सरकारने मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्यामुळे महसूल विभागाकडून आता केवळ ५०० रुपयांचा मुद्रांक शुल्क जारी करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसणार आहे त्यामुळे हा निर्णय तातडीने रद्द बातल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

### भेंडटाकळीत शॉक लागून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू



**तलवाडा । प्रतिनिधी**

शेतातील डि.पी.चा शॉक लागून शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सकाळी १० वाजण्याच्या सुमारास भेंडटाकळी तांडा (ता.गेवराई) येथे घडली. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील भेंडटाकळी तांडा येथील रहिवासी गोरख कनिराम राठोड, (वय ४५ वर्षे ) यांचा विजेचा धक्का लागुन आज सकाळी १० वाजता शेतात शॉक लागून जागीच मृत्यू झाला. बीडच्या जिल्हा रूग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून पुढील तपास तलवाडा पोलिस करीत आहेत.

## श्री.क्षेत्र कपिलधार येथील मन्मन स्वामींच्या दर्शनासाठी मध्यप्रदेशचे कॅबिनेट मंत्री रविकिरण शाहू यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**



बीड जवळील तिर्थक्षेत्र असलेले कपिलधार येथे मध्यप्रदेशचे कॅबिनेट मंत्री ना.रविकिरण शाहू यांनी भेट देवून श्री.संत मन्मथ स्वामींचे दर्शन घेवून धबधबा आणि कुंड परिसराची पाहणी केली यावेळी त्यांचा देवस्थान कमिटी श्री.भुरे यांनी तर्फे शाल, श्रीफळ व श्रीसंत मन्मन स्वामींची प्रतिमा देवून सत्कार केला.

भेटीदरम्यान मंत्री रविकिरण शाहू म्हणाले की, श्री.क्षेत्र कपिलधार येथे एकदम शांत व मन प्रसन्न करणारे वातावरण आहे. सध्या नर्मदा कलशयात्रा मी करत असून नर्मदा कलशयात्रा ही भारतासह ४ देशात सुरु आहे. एकुण ११ देशांत ही यात्रा पोहोंचणार आहे मंत्री रविकिरण यांनी ठरवलेले सर्व कार्य पुर्ण होईपर्यंत ते अनवाणी फिरणार आहेत.

तसेच हिंदु धर्मात चांगले विचार आचरण करण्याची पद्धती आहे. सनातन हिंदु धर्मावर सतत संकटे येत असतात ते बंद झाले पाहिजे असेही ते म्हणाले यावेळी देवस्थान कमिटीचे श्री.भुरे, विश्वनाथ स्वामी पुजारी, श्री.शिवरुद्र विटेकर व इतर शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.